**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः16.10.2024** **वारःबुधवार**

---

## ठळक बातम्या,

१. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर,
२. आठव्या इंडिया मोबाइल कॉंग्रेसचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन,
३. राष्ट्रपतींच्या अल्जेरिया दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधांना चालना, राष्ट्रपती आज मॉरिटानियाला रवाना होणार,
४. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे नेते ओमर अब्दुल्ला आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार,
आणि
५. भारत आणि न्यूझीलंडमधील पहिला कसोटी क्रिकेट सामना आजपासून बंगळुरूमध्ये.

**विधानसभा निवडणूक**
महाराष्ट्र आणि झारखंड मधल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम काल केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केला. यामुळे कालपासून या राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे.
महाराष्ट्रातल्या सर्व 288 विधानसभा मतदारसंघांमध्ये 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल नवी दिल्ली इथं झालेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसह विविध राज्यांतल्या 47 विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुका तसंच नांदेड आणि वायनाड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या.
नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनानं रिक्त झालेल्या लोकसभेच्या एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरलाच मतदान होणार आहे. तर लोकसभेच्या वायनाड मतदार संघाचे खासदार राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यानं रिक्त झालेल्या या जागेच्या पोटनिवडणुकीसाठी 13 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. कॉंग्रेसनं उमेदवार म्हणून या जागेसाठी प्रियंका गांधी यांच्या नावाची घोषणा केली आहे. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीची अधिसूचना येत्या 22 तारखेला

जारी केली जाईल. 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत असून 30 ऑक्टोबरला अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत 4 नोव्हेंबर पर्यंत असेल. 20 नोव्हेंबरला मतदान आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होईल.
राज्यातल्या 9 कोटी 63 लाख मतदारांसाठी 1 लाख 186 मतदान केंद्रं उभारण्यात येणार आहेत. यावेळी निवडणूक आयोगानं 530 आदर्श मतदान केंद्रं उभारण्याचं नियोजन केल्याची माहिती राजीव कुमार यांनी दिली. मतदारांनी मोठ्या संख्येनं लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी व्हावं असं आवाहन राजीवकुमार यांनी केलं.

**झारखंड निवडणूक**

झारखंड विधानसभेची निवडणुकीसाठी पुढील महिन्याच्या 13 आणि 20 तारखेला दोन टप्प्यात मतदान होणार आहे तर 23 तारखेला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर राज्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. राज्यात दोन्ही आघाड्या उमेदवारांची यादी अंतिम करण्यात गुंतलेल्या असून जागावाटपाचं सूत्र निश्चित करण्यासाठी मित्रपक्षांशी जोरदार चर्चा सुरू आहेत. भाजपचे झारखंड निवडणूक सहप्रभारी हिमंत बिस्व सरमा यांनी दिलेल्या माहितीनुसार, यावेळी भाजपा जनता दल युनायटेड आणि चिराग पासवान यांच्या नेतृत्वाखालील लोजपासोबत निवडणूक लढवणार आहे. दुसरीकडे झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि भाकप यांच्यासोबत निवडणूक लढवणार आहे.

**बैठक**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक काल रात्री नवी दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात पार पडली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि पक्षाचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

**परिषद**

नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय दूरसंचार महासंघ आणि जागतिक दूरसंचार मानकीकरण परिषद अर्थात आयटीयू-डब्ल्यूटीएसए 2024 यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या इंडिया मोबाइल काँग्रेसचं उद्घाटन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. ही परिषद भारत मंडपम इथं होत आहे. यामध्ये सहभागी उद्योगक्षेत्रातील नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडिया बाबतच्या दृष्टीकोनाची प्रशंसा केली. “तिसऱ्या कार्यकाळामध्ये पंतप्रधानांनी इंडियन मोबाइल काँग्रेस (आयएमसी) ला नाविन्यपूर्ण आणि सहकार्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून स्थान दिलं असल्यामुळे डिजिटल क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाली आहे,” असे गौरवोदगार रिलायन्स जिओ-इन्फोकॉम

लिमिटेडचे अध्यक्ष आकाश अंबानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाबद्दल त्यांची प्रशंसा करताना काढले. “खऱ्या परिवर्तनाची सुरुवात 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने झाली,” असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडियाच्या संकल्पनेचा आढावा घेताना भारती एअरटेलचे संस्थापक आणि अध्यक्ष सुनील भारती मित्तल यांनी सांगितलं.

**आमदार शपथ विधी**

विधानपरिषदेच्या 7 राज्यपाल नियुक्त आमदारांचा शपथविधी काल झाला. विधान परिषदेच्या सभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी या आमदारांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यात चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे.

**जम्मू-काश्मीर-शपथविधी**

जम्मू-काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला आज  मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. नायब राज्यपाल मनोज सिन्हा सकाळी 11.30 वाजता श्रीनगरमधील शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ओमर अब्दुल्ला आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला शपथ देणार आहेत. दहा वर्षांनंतर इथं झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स पक्षानं बहुमत मिळवलं आहे. कार्यक्रम सुरक्षित आणि निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी कार्यक्रमस्थळाभोवती कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**राष्ट्रपती**

परदेश दौऱ्यावर असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जिरियाचा तीन दिवसांचा दौरा आटोपून आज दुसऱ्या टप्प्यात मॉरिटानियाला रवाना होणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू यांनी अल्जेरियाचे उच्चपदस्थ आणि शिष्टमंडळांसोबत विविध द्विपक्षीय बैठका घेतल्या आणि भारत-अल्जेरिया संबंधांना बळकटी मिळण्याच्या दृष्टिकोनातून विचारविनिमय केला.  राष्ट्रपतींच्या आज सुरू होत असलेल्या मॉरिटानियाच्या एका दिवसाच्या दौऱ्यात अनेक कार्यक्रम होणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मॉरिटानियाचे पंतप्रधान मोहम्मद ओल्ड गजौआनी आणि इतर नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकांमध्ये सहाभागी होतील. त्यानंतर राष्ट्रपती मुर्मू मॉरिटानियातील भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत. राष्ट्रपतींचा अल्जेरिया दौरा ऐतिहासिक ठरला असून या दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधांना चालना मिळेल. तसंच ब्रिक्समध्ये अल्जेरियाच्या सदस्यत्वाच्या मुद्द्याला भारत पाठिंबा देईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव अरुणकुमार चॅटर्जी यांनी मंत्रालयानं  प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**एससीओ**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर आज इस्लामाबाद इथं  शांघाय सहकार्य संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेच्या 23 व्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी ते काल पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद इथं दाखल झाले. शांघाय सहकारी संघटनेची बैठक पाकिस्तानच्या अध्यक्षतेखाली होत असून डॉ. जयशंकर या कार्यक्रमात भारताचं प्रतिनिधित्व करत आहेत. ही बैठक दरवर्षी आयोजित केली जाते आणि संघटनेच्या व्यापार आणि आर्थिक प्राधान्यांच्या मुद्यांवर लक्ष केंद्रित करते. दरम्यान, जयशंकर यांनी काल पाकिस्तानचे पंतप्रधान शाहाबाज शरीफ यांची औपचारिक भेट घेतली, मात्र आपला पाकिस्तान दौरा बहुपक्षीय कार्यक्रमासाठी असल्याचं स्पष्ट करत  द्विपक्षीय चर्चेची शक्यता जयशंकर यांनी फेटाळली आहे.  गेल्या नऊ वर्षांत भारतीय परराष्ट्र व्यवहारमंत्र्यांचा हा पहिलाच उच्चस्तरीय पाकिस्तान दौरा आहे.

**सीतारामन**

केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहारमंत्री निर्मला सीतारामन उद्यापासून मेक्सिको आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या महिन्याच्या 17 ते 20 तारखेदरम्यान मेक्सिको दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात सीतारामन 'टेक लीडर्स' गोलमेज परिषदेचं अध्यक्षपद भूषवतील.  या परिषदेच्या निमित्तानं माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख भारतीय दिग्गजांसह या क्षेत्रातील जागतिक स्तरावरील नेते एकत्र येत आहेत. सीतारामन मेक्सिकोचे अर्थमंत्री रोगलिओ रामिरेझ दे लाओ यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेणार असून संसदीय सहकार्य बळकट करण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी त्या मेक्सिकन संसदेच्या अनेक सदस्यांशीही चर्चा करणार आहेत. त्यानंतर मेक्सिको सिटीमध्ये आयोजित भारत-मेक्सिको व्यापार आणि गुंतवणूक शिखर परिषदेत सीतारामन यांचं मुख्य भाषण होणार आहे.  या परिषदेत उभय देशातील  महत्त्वाच्या उद्योग प्रमुखांचा सहभाग असेल. भारतीय जनसमुदायानं आयोजित केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमामध्येही त्या सहभागी होणार आहे. त्यानंतर 20 ते 26 तारखेदरम्यान त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात त्या अमेरिकेला जाणार आहेत.

**नेमबाजी**

नवी दिल्ली इथं काल झालेल्या आयएसएसएफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या सोनम मसकर हिने 10 मीटर एअर रायफल प्रकारात रौप्य पदक जिंकलं. तिने 252 पूर्णांक 9 गुण मिळवले. या स्पर्धेत चीनच्या युतिंग हुआंगनं सुवर्ण, तर फ्रान्सच्या ओसियन मुलरनं कास्य पदक पटकावलं.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला पहिला कसोटी क्रिकेट सामना आजपासून बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरू होणार आहे. सकाळी साडेनऊ वाजता सामना सुरू होईल. तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना येत्या 24 तारखेपासून पुण्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे. तर तिसरा सामना एक नोव्हेंबरपासून मुंबईतल्या वानखेडे मैदानावर खेळला जाईल.

**तमिळनाडू-पाऊस**

बंगालच्या उपसागरात चेन्नईपासून सुमारे 490 किलोमीटर अंतरावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आज पुद्दुचेरी आणि नेल्लोर दरम्यान उत्तर तामिळनाडू आणि दक्षिण आंध्र प्रदेश किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळं पुढील 24 तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची आणि पुढील दोन दिवस मुसळधार पावसाची शक्यता तमिळनाडू हवामान खात्यानं वर्तवली आहे. चेन्नई, कुड्डालोर, एन्नोर, कट्टुपल्ली आणि पुद्दुचेरी इथं वादळाचा इशारा देण्यात आला असून थुथुकुडी, पंबन आणि कराईकलमध्ये सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. आज मुसळधार पावसाचा अंदाज असल्यानं जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था बंद राहणार आहेत.

**हवामान-आयएमडी**

दरम्यान, नैऋत्य मोसमी पावसानं काल संपूर्ण देशातून माघार घेतली, त्याचवेळी दक्षिण भारतात ईशान्य मान्सून सक्रीय झाला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**